नि.दि.दा.क्र. ४७/२०१५

मोजाबाई –वि– मांगा

**नि.क्र. ९७**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २**

**<u>सर तपास प्रतिवादीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. के.पी. बैसाने यांचेमार्फत</u>–**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नांव– दशरथ टेंबऱ्या वसावे

वय – ६२ वर्षे, व्यवसाय– शेती,

रा. तलाई, ता. धडगांव, जि. नंदुरबार.

मी माझ्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ९७ वर दाखल केले आहे. त्यातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे व दिलेल्या माहीतीप्रमाणे लिहीलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. तो मला वाचून दाखविला. त्यावर मी वाचून व समजून माझी निशाणी सही केली आहे. मी माझ्या ओळखीसाठी अधारकार्डाची पडताळलेली प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ९८** देण्यात येत आहे.

**सर तपास पुर्ण.**

**उलट तपास वादीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. एस. ओ. ठाकूर यांचेमार्फत–**

वादी हजर. वादींचे विद्वान अधिवक्ता हजर. वादींच्या विद्वान अधिवक्तांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास १८.०३.२०२६ पर्यंत तहकुब

समक्ष

**स्वा/–**

**(भुषण शं. वाढई )**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव

फेब्रुवारी १८, २०२६

सा.वा.दा.ब.अ.क. केले

**स्वा/–**

**(भुषण शं. वाढई )**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव

फेब्रुवारी १८, २०२६

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २**

**उलट तपास वादीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. एस. ओ. ठाकूर यांचेमार्फत–**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नांव– दशरथ टेंबऱ्या वसावे

०२. हे म्हणने खरे आहे की, वादी प्रतिवादी हे माझे चुलत भाउ आहेत. तसेच वादी या माझ्या चुलत बहिणी आहेत. हे म्हणने खरे आहे की, वादी यांचे लग्न होउन ते दुसऱ्या गावी राहत आहे. हे म्हणने खरे आहे की, तलाई गावाची सरपंच माझी सुन आहे. प्रः माझे प्रतिवादींशी चांगले संबंध आहे. उः वादी व प्रतिवादी दोघांशीही चांगले संबंध आहे. मला वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध माहिती आहे. हे म्हणने खरे आहे की, राया हात्याच्या वादी ह्या मुली आहेत. हे म्हणने खरे आहे की, राया हात्याला वादी मुलींव्यतिरीक्त दुसरे कोणीही वारस नाही. हे म्हणने खरे आहे की, दावा मिळकती या वादींना फेरफार क्र. ३७, १०० व ११७ प्रमाणे वाटणीने मिळाल्या. |**प्रः** सदर फेरफारानंतर वाटणीप्रमाणे वादी व प्रतिवादी खेडपेर करित होते. **उः** पूर्वीप्रमाणेच एकत्र खेडपेर करतात काही जमिनी वेगवेगळ्या खेडपेर करतात.| हे म्हणने खरे आहे की, दि. १३.०७.२०१५ रोजी वादींने वारस नोंदणीसाठी अर्ज केला होता. मला माहित नाही की, त्या अर्जावर प्रतिवादींनी आक्षेप घेतला होता. हे म्हणने खरे आहे की, वादींचे वारस म्हणून नाव चढले व त्यांना सातबारे मिळाले.

०३. हे म्हणने खरे नाही की, वादी हे त्यांचा हिश्श्यातील जमिनी दि. १७.११.२०१५ रोजी खेडपेर करित असतांना प्रतिवादी यांनी त्यांना हरकत अडथळा निर्माण केला. हे म्हणने खरे आहे की, प्रतिवादी हरकत अडथळा करु नये म्हणून वादींने सदरचा मनाई हुकूमाचा दावा दाखल केला आहे. हे म्हणने खरे आहे की, वादींने राया हात्या आणि हात्या नकट्या या दोघांचे मृत्यू चे दाखले या दाव्यासेबत दाखल केले आहेत. हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादींनी सांगितल्याप्रमाणे पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आणि आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष

Digitally signed by BHUSHAN SHANKAR WADHAI
Date: 2026.04.22 15:16:55 +0530

**(भुषण शं. वाढई )**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव

एप्रिल २२, २०२६

सा.वा.दा.ब.अ.क. केले

Digitally signed by BHUSHAN SHANKAR WADHAI
Date: 2026.04.22 15:17:03 +0530

**(भुषण शं. वाढई )**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव

एप्रिल २२, २०२६